औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळाच्या दिनांक ३.५.९७ रोजी झालेल्या १०४ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत.

---

बैठकीस खालील पदाधिकारी उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १] | श्री किशनचंद तनवाणी | सभापती/औरंगाबाद मंडळ |
| २] | श्री एच. के. जावळे/मुख्य अधिकारी | सदस्य/औरंगाबाद मंडळ |
| ३] | श्री आय. टी. गायकवाड/शहर अभियंता आयुक्त महानगरपालिका/औरंगाबाद यांचे प्रतिनिधी. | सदस्य /औरंगाबाद मंडळ |
| ४] | श्री नायर सहाय्यक नगररचनाकार उप संचालक औरंगाबाद विभाग | सदस्य प्रतिनिधी |
| ५] | श्री नारायण जाधव | सदस्य औरंगाबाद मंडळ |
| ६] | श्री गणेश माहोरे | सदस्य औरंगाबाद मंडळ |
| ७] | श्री अनिल पोलकर | सदस्य औरंगाबाद मंडळ |
| ८] | श्री अशोक लोमटे. | सदस्य औरंगाबाद मंडळ |
| ९] | श्रीमती कमल तुल्ले. | सदस्या औरंगाबाद मंडळ |
| १०] | श्रीमती उषाताई साने. | सदस्या औरंगाबाद मंडळ |
| ११] | श्री नंदु कूलकर्णी | सदस्य औरंगाबाद मंडळ |
| १२] | श्री कैलासचंद सेठी. | सदस्य औरंगाबाद मंडळ |

[...... पान २ वर .... ]

(signature)

वंदे मातरम या राष्ट्रीय गितानंतर मंडळाच्या बैठकीस सुरवात झाली. श्री मुकेश जैस्वाल व श्री आसारामजी तळेकर यांनी बैठकीस येऊ शकणार नाही असे दुरध्वनी वरुन कळविले आहे असे मुख्य अधिकारी यांनी ~~खुलासा केला.~~ सांगितले व त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेऊन बैठकीला सुरुवात झाली.

दिनांक ८.१.१९९७ रोजी झालेल्या मंडळाच्या १०३व्या बैठकीच्या कार्यवृत्तांतावर केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल लेखी स्वरुपात सर्व सदस्यांना दिला. अनुपालन अहवाला बाबत मुख्य अधिकारी यांनी मंडळास सविस्तर माहिती दिली.

या चर्चेच्या अनुषंगाने मा. सभापतींनी विचारले की, मंडळाच्या कार्यक्षेत्रातील जिल्हयाच्या ठिकाणी गृहनिर्माण योजना राबविण्यांच्या दृष्टीने मागणी आजमाविण्याचे ठरले होते. त्या बाबत काय झाले ?.

या विषयी मुख्य अधिकारी यांनी माहिती दिली मंडळा अंतर्गत गृहनिर्माण योजनेच्या अंदाज घेण्यासाठी जाहिरात तयार आहे. व सदरची जाहिरात आकर्षक करण्यासाठी प्रयत्न करण्यांत येत आहेत. लवकरच जाहिरात देण्यांत येईल असे मुख्य अधिकारी यांनी सांगीतले. या विषयाच्या अनुषंगाने मंडळाचे सदस्य श्री गणेश माहोरे यांनी सूचना केली की, शासनाने मागासवर्गीय सहकारी गृहनिर्माण संस्थाना जागा दिलेल्या आहेत. परंतू त्या संस्था घरे बांधु शकत नाही तेंव्हा मंडळातर्फे सदर जमीनीवर योजना राबविता येईल का ?.

या वर खुलासा करण्यांत आला की विशेष घटकासाठी योजना राबविता येत नाही. त्यासाठी म्हाडा मार्फत शासनाची मान्यता घ्यावी लागेल.

मंडळाचे सदस्य श्री अनिल पोलकर, यांनी प्रतिपादन केले की, मंडळाच्या बैठकीत जमीन संपादनासाठी समीती गठीत करण्यांत आली होती. त्या समीतीने जमीनी संपादना बाबत पाहणी केली आहे किंवा नाही.

या बाबत मुख्य अधिकारी/औरंगाबाद मंडळ यांनी माहिती दिली की सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे प्रथम मागणी अंदाज घेणे, योजना तयार करणे, योजनेस प्राधिकरणाची/शासनाची मंजूरी घेऊन त्या नंतरच जमीन संपादनाची प्रक्रिया सुरु करता येऊ शकेल. प्रथम मंडळाच्या

[ .....३.... ]

कार्यक्षेत्रात उपलब्ध असलेल्या शासकिय जमीनी मिळविण्याचा प्रयत्न करण्यांत येत आहे. त्यासाठी मंडळस्तरावर पाठपुरावा करण्यांत येत आहे, असे मुख्य अधिकारी यांनी सांगीतले या नंतर मुख्य अधिकारी यांनी प्रतिपादन केले की उस्मानाबाद, अंबेजोगाई, हिंगोली, इत्यादि ठिकाणी शासकिय जमीनी मिळण्याची शक्यता आहे. व जालना येथे ५.०० हेक्टर शासकिय जमीन लवकरच मिळणार आहे. मुख्य अधिकारी यांनी सांगीतले की, मागणी अंदाज आजमीविल्या नंतरच खाजगी जमीन संपादनासाठी प्रयत्न करता येईल.

मंडळाच्या वसाहतीतील अनाधिकृत बांधकाम व सरचार्ज बाबतची माहिती मिळकत व्यवस्थापक औरंगाबाद मंडळ यांनी मंडळास दिली. अनाधिकृत बांधकाम निदर्शनास आल्यानंतर अनाधिकृत बांधकाम करणाऱ्या गाळेधारका विरूध्द सक्षम प्राधिकारी[२] मुंबई यांचे कडे ३५५ प्रकरणी दाखल केलेली आहे. या प्रकरणी अंतीम निर्णय झालेला नाही. २९ प्रकरणात गाळेधारका विरुद्ध निष्कासनाची कार्यवाही करण्याचे आदेश सक्षम प्राधिकारी यांचे कडून प्राप्त झाले होते. त्यानुसार गाळेधारकांना गाळ्या मधून काढून टाकण्याची कार्यवाही करण्यांत आली होती. परंतू संबंधीत गाळेधारकांनी अपील करून स्थगीती मिळविल्यामुळे पूढील कार्यवाही करता आलेली नाही, असे मिळकत व्यवस्थापक यांनी मंडळास सांगितले.

या विषयावर चर्चा करतांना मंडळाचे सदस्य श्री नंदु कुलकर्णी व ॲडव्होकेट श्री कैलासचंद सेठी यांनी प्रतिपादन केले की, मंडळाचे सदस्य हे अनाधिकृत बांधकाम काढून टाकण्याचा प्रयत्न करतात अथवा अनाधिकृत बांधकाम होऊ नये अशी अपेक्षा असते. तेंव्हा अनाधिकृत बांधकाम हे मंडळाच्या सदस्यांच्या संम्मती शिवाय परस्पर नियमीत करण्यांत येऊ नये.

मिळकत व्यवस्थापक यांनी मंडळाच्या ८५ वसाहती पैकी २७ वसाहतीचे सरचार्ज बाबतची माहिती मंडळास दिली व या वसाहतीतील एकूण सरचार्ज ची थकबाकी त्यापैकी वसूल झालेला सरचार्ज, व बाकी असलेला सरचार्ज ह्या बाबतची सविस्तर माहिती सर्व सन्माननीय सदस्यांना दिली तसेच पूढे विषद केले की संबंधीत गाळेधारक सरचार्ज भरण्यास तयार नसतात व सरचार्ज भरण्या बाबत वाद घालतात विशेषत: औरंगाबाद व्यतिरीक्त इतर

[ ......४... ]

ठिकाणाचे गाळेधारक सरचार्ज देण्यास विरोध करतात याही पूढे मिळकत व्यवस्थापक यांनी विषद केले की गाळे वाटपा पासून ते आता पर्यन्त काही गाळेधारकांनी त्याच्या कडील थकीत असलेले हप्ते ही भरलेले नाहीत.

या विषयावर चर्चा करतांना मुख्य अधिकारी यांनी प्रतिपादन केले की, जानेवारी १९९७ पासून ते मार्च १९९७ पर्यन्त रुपये १२९.०५ लक्ष ची विक्रमी वसूली केलेली आहे परंतू औरंगाबाद व्यतिरीक्त सरचार्ज वसूल करण्यास अडचणा निर्माण होत आहेत.

मुख्य अधिकारी यांनी सांगीतले की रेंट रोल व भाडे वसूलीकाराचे क्षेत्रिय पूस्तकाचा [ फिल्ड बुक ] ताळमेळ घालण्याचे काम चालू आहे. वसूली बाबत येणा-या अडचणी पैकी मुख्य अडचण अशी आहे की, मंडळाने परभणी, तुळजापूर, लातूर, जालना, या ठिकाणी बांधलेल्या गाळ्यांच्या किंमतींना मर्यादा होती त्यामूळे वसाहतीतील बाहय सुविधा नगरपालिकांच्या मापदंडा प्रमाणे पुरविणे शक्य झालेले नव्हते. व ब-याच वसाहतींना नगर पालिकेनी बाहय सुविधा पुरविण्याचा ठराव करून ही बाहय सुविधा पुरविलेल्या नाहीत या सुविधा नसल्यामूळे गाळेधारक मासिक हप्ते व थकीत हप्त्या वरील सरचार्ज भरत नाहीत.

सरचार्ज विषया बाबत चर्चा करतांना मंडळाचे सदस्य प्रा. नंदू कूलकर्णी यांनी सुचना केली की, सरचार्ज वसूली बाबत नगरपालिका पाणी पट्टी भरली नाही तर नळ कनेक्शन तोडते त्याप्रमाणे आपल्या वसूलीसाठीही नगरपालिकाची मदत घेता येईल काय असे पहावे.

या अनूषंगाने चर्चेत भाग घेतांना मंडळाचे सदस्य ॲड. कैलासचंद सेठी यांनी प्रतिपादन केले की, सरचार्ज बाबतचा मुददा हा गेली एक दिड वर्षा पासून मंडळाच्या बैठकीत चर्चेला येत आहे. मंडळाचे सदस्य चर्चा करतात परंतू भाडे वसुलीकार यांच्या विरूद्ध काहीही कार्यवाही केलेली नाही अथवा त्यांना बदलण्यात आलेले नाही.

मुख्य अधिकारी/औरंगाबाद मंडळ व त्यांचे अधिकारी व कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेऊन मंडळाची विक्रमी वसूली केली या बद्दल मा. सभापती व सन्माननीय सदस्यांनी विक्रमी वसूली केल्यामूळे मुख्य अधिकारी व कर्मचारी यांचे अभिनंदन केले.

[ ...५... ]

सरचार्ज वसूली बाबतच्या मुददयावर चर्चा करतांना मा. सभापती व मंडळाचे इतर सदस्यांनी प्रतिपादन केले की, जालना येथील भाडे वसूलीकार श्री पि. टी. काळे, व अविष्कार कॉलनी , सिडको, औरंगाबाद येथील भाडेवसूलीकार श्री एस. अ. भोजूळे, यांची त्वरीत बदली करण्यांत येऊन त्यांनी कार्यालयात पदस्थापना करण्यांत यावी तसेच जे ब-याच वर्षापासून भाडेवसूलीकार म्हणून काम करीत आहेत त्यांना ही बदलण्यांत यावे.

श्रीमती उषा साने सदस्या औरंगाबाद मंडळ यांनी प्रतिपादन केले की आय. आय. सी अंतर्गत जुन्या वसाहतीतील बाह्य सुविधांच्या उन्नतीकरणाची योजना आहे तेव्हा या योजनेतून परभणी साठीही बाह्य सुविधा पुरविण्याची कार्यवाही करावी.

यावर खुलासा करण्यांत आला की, आय. आय. सी. या योजनेतील निधी शासन स्तरावर व शासनाच्या मंजूरीने ... प्राप्त होत असतो.

मंडळाच्या सदस्यांनी प्रतिपादन केले की आय. आय. सी या योजने अंतर्गत या वसाहतींना सुविधा उपलब्ध करून देऊन गाळेधारकांना थकीत हप्ते व सरचार्ज भरण्यास प्रोत्साहित करावे.

श्रीमती साने यांनी परभणी येथील मंडळाच्या वसाहतीतील सुविधांचे उन्नतीकरण करण्यासाठी अंदाजपत्रक तयार करण्यांत यावे असे सुचविले. यावर मुख्य अधिकारी यांनी कार्यकारी अभियंता यांना या बाबत कार्यवाही करण्या विषयी सुचना दिल्या.

मा. सभापती/औरंगाबाद मंडळ, यांनी मिळकत व्यवस्थापक यांना विचारले की सरचार्ज बाबतची सविस्तर माहिती देण्यास किती कालावधी लागेल. या वर मिळकत व्यवस्थापक यांनी सांगीतले की, सरचार्ज बाबतची सविस्तर माहिती तयार करण्यास दोन महिने लागतील. मा. सभापती यांनी प्रतिपादन केले की दोन महिन्या नंतर सरचार्ज या विषयावरच मंडळाची खास बैठक घेण्यांत येईल.

मंडळाच्या १०३ बैठकीच्या कार्यवृत्तांतावरील अनुपालन अहवाला वर चर्चा होऊन झालेल्या चर्चेनुसार कार्यवाही करण्याचा निर्णय घेऊन मंडळाने असा निर्णय घेतला की,

ठराव क्र. ६२४

मंडळाच्या दिनांक ८.१.९७ रोजी झालेल्या १०३व्या बैठकीच्या कार्यवृत्तांतावर चर्चा होऊन झालेल्या चर्चेवर/ निर्णयावर कार्यवाही करण्याचा निर्णय घेऊन मंडळाच्या १०३व्या बैठकीच्या कार्यवृत्तांत कायम करण्यात आला.

विषय क्र. २

उदगीर जिल्हा लातूर नगर पालिकेच्या संजय नगर या झोपडपट्टीच्या सूधार कामांच्या प्रस्तावास प्रशासकिय मान्यता प्रदान करणे बाबत.

---

या विषयाची माहिती मंडळास मुख्य अधिकारी यांनी दिली व पूढे नमूद केले की, उदगीर जि. लातूर नगर परिषदेच्या संजयनगर झोपडपट्टी सूधार योजनेचे अंदाजपत्रक रुपये १७,३६,८३१/- असून त्यास रक्कम रु. १५,९६,८५०/- ची प्रशासकिय मान्यता देता येणे शक्य आहे.

उदगीर येथील झोपडपट्टी सूधार योजनेसाठी सन १९९७-९८ या आर्थिक वर्षा करीता रुपये ४.०० लक्षाची तरतूद प्रस्तावित आहे. नगरपरिषदेच्या हाती कामे असण्याच्या दृष्टीने सदर प्रस्तावास प्रशासकिय मान्यता [illegible] . बाब टिप्पणीत नमूद केलेल्या एकूण [५] अटीच्या अधिन राहून देण्यांत यावी.

यावर चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की,

ठराव क्र. ६२५

उदगीर नगर पालिकेने संजयनगर या घोषीत झोपडपट्टींच्या रुपये १७,३६,८३१/- रुपयांच्या अंदाजपत्रकास झोपडपट्टी सूधार कामांना नियमाप्रमाणे रुपये ८००/- दरडोई या सूधारित मानकानूसार रुपये १६,००,०००/- पर्यन्तची प्रशासकिय मान्यता देता येते.

[ ....७... ]

नगरपरिषद उदगीर ने दाखल केलेल्या अंदाजपत्रकीय प्रस्तावाची छाननी केल्यानूसार रूपये १५,९६,८५०/- रूपयाची प्रशासकिय मान्यता बाब टिप्पणीत नमूद केलेल्या एकूण ५ अटीच्या अधिन राहून देण्यांत येत आहे.

विषय क्र. ३:- औरंगाबाद मंडळाच्या सन १९९५-९६ चा वार्षीक लेखा.

या विषयाची माहिती मुख्य लेखा अधिकारी यांनी मंडळास माहिती दिली यावर चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की,

ठराव क्र. ६२६

औरंगाबाद मंडळाच्या सन १९९५-९६ च्या वार्षीक लेखा सर्वानुमते मंजूर करण्यांत येतो.

विषय क्र. ४:- शहर भूमापन क्र. २०७२१ गृहनिर्माण भवनाजवळील औरंगाबाद या जमीनीवरील नियोजित ४८ मध्यम उत्पन्न गट [ब] अंतर्गत गाळ्यांच्या बांधकामाच्या प्राप्त निविदेवर निर्णय घेण्या बाबत.

या विषयाची बाब टिप्पणी कार्यकारी अभियंता औरंगाबाद मंडळ यांनी मंडळास वाचून दाखविली. गृहनिर्माण भवनाजवळील ४८ मध्यम उत्पन्न गट योजनेच्या अंदाजपत्रकास व नकाशास प्राधिकरणाने पत्र क्र. एमएच/का. अ./ /२/औ. मं. /मु. अ. /२९४/२४६९/९६ दिनांक ७. १२. ९६ अन्वये रूपये १, २१, १०, ४००/- च्या खर्चास सूधारित प्रशासकिय मान्यता प्रदान केली आहे व १९९७-९८ चे अंदाजपत्रकात रूपये ६०. ०० लक्षाची तरतूद आहे.

४८ गाळ्यांच्या बांधकामासाठी वृत्त पत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यांत आल्या होत्या. विहित मुदतीत ०७ निविदा विकल्या गेल्या व त्यापैकी विहित दिनांका पावेतो म्हणजे ३. १. १९९७ रोजी एक निविदा सिलबंद प्राप्त झाली. सदर निविदा त्याच दिवशी कार्यकारी अभियंता यांच्या कार्यालयात मुख्य अधिकारी यांच्या समक्ष उघडण्यांत आल्या.

[......८....]

मे. रुद्रानी कन्सट्रक्शन कंपनी औरंगाबाद यांनी २६.९९ टक्के जास्त दर निविदेत दिला आहे.

सदर कामाचे निविदेतील अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वर्ष १९९४-९५ च्या दरसुचीनुसार होते. व सदर निविदा [ २६.९९ % ] जास्त, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रचलीत दर सुचीवर ५.५५ % कमी येते.

सदर गाळ्यांची जाहिराती प्रमाणे अंदाजीत विक्री किंमत रुपये २,७९,५००/- होते व अर्ज सोबत रुपये २५,०००/- अनामत रक्कमेसह एकूण ४९ अर्ज प्राप्त झाले होते. आता निविदेत दर २६.९९ % जास्त प्रमाणे सध्याची अंदाजित विक्री किंमत रुपये ३,३०,०००/- प्रतिगाळा येते व ती पूर्वीच्या जाहिर किंमती पेक्षा रुपये ५०,५००/- [ १८ % ] ने जास्त होते.

या विषयावर चर्चा करतांना मंडळाचे सदस्य श्री ॲड. कैलासचंद सेठी यांनी प्रतिपादन केले की, योजना तयार केल्यानंतर प्राधिकरणाकडे प्रशासकिय मान्यतेसाठी पाठविण्याचा व निविदा मागविण्याचा कालावधी या मध्ये बराच कालावधी जातो. त्यामूळे गाळ्यांच्या किंमतीत वाढ होते हा कालावधी कमी करण्यासाठी पाठपूरावा करण्यांत यावा व प्राधिकरण स्तरावरील प्रकरणी निकाली काढण्यासाठी मंडळाने जी समीती गठीत केली आहे त्या समीती मार्फत हा पाठपूरावा करण्यांत यावा.

या पूढे कैलासचंदसेठी यांनी सूचना केली की सदर ठेकेदाराने दिलेला दर हा प्रचलित दरानूसार ५.५५% कमी येतो. त्यास काम देतांना कामाची गुणवत्ता राखली जाईल या कडे लक्ष देण्यांत यावे.

या विषयावर चर्चा करतांना असे ठरले की, रुद्रानी कन्सट्रक्शन कंपनी च्या प्रतिनिधीस मंडळासमोर वाटाघाटी करण्यासाठी बोलविण्यांत यावे. त्यानूसार मे. रुद्रानी कन्सट्रक्शन कंपनीच्या प्रतिनिधीस मंडळा समोर बोलविण्यांत आले व मंडळाने त्यांनी निविदेत दिलेला दर हा कमी करण्या विषयी सुचविले.

यावर मे. रुद्रानी कन्स्ट्रक्शन कंपनी यांनी सांगीतले की निवेदीत दर १९९६-९७ च्या दर सुचीशी तुलना केली असता प्रचलित दर सुचीवर ५.५५% कमी येतो व आजच्या परिस्थितीत आणखी दर कमी करणे शक्य नाही व तसे परवडणार नाही.

.....९

यावर मंडळाच्या सदस्यांनी बांधकामाची गुणवत्ता पातळी चांगली असली पाहिजे असे सुचवून यावर मंडळाने चर्चा करून एकमताने निर्णय घेतला की,

ठराव क्र. ६२७

मे. रुद्रानी कन्स्ट्रक्शन कंपनी औरंगाबाद यांनी शहर भूमापन क्र. २०७२१ गृहनिर्माण भवन जवळील औरंगाबाद ४८ मध्यम उत्पन्न गट [ ब ] गाळ्यांच्या बांधकामासाठी दाखल केलेली निविदा २६.९९% जास्त या दराने मंजूर करण्यात येतात. या ठरावाच्या स्थायीकरणाची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी.

विषय क्र. ५: परभणी येथील सर्वे क्र. ५२७ [भाग] वरील २५ गाळे अल्प उत्पन्न गट व १५ गाळे मध्यम उत्पन्न गट [१] अंतर्गत योजनेच्या गाळ्यांच्या बांधकामासाठी प्राप्त झालेल्या निविदावर विचार व निर्णय घेणेसाठी.

या विषयाची बाब टिप्पणी कार्यकारी अभियंता, औरंगाबाद मंडळ यांनी मंडळास वाचून दाखविली.

कार्यकारी अभियंता यांनी मंडळास माहिती दिली की, परभणी येथील सर्वे क्र. ५२७[भाग] या जमीनीवरील २५गाळे अल्प उत्पन्न गट व १५ गाळे मध्यम उत्पन्न गट [१] या योजनेस प्राधिकरणाने २५.७.९६ रोजी प्रशासकिय मान्यता दिली.

सदर गाळ्यांच्या बांधकामासाठी वृत्त पत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यांत आल्या विहित कालावधीत प्रत्येकी ०५ निविदा विकल्या गेल्या २३.१२.९६ रोजी प्रत्येकी ०४ सिलबंद निविदा प्राप्त झाल्या सदर निविदा त्याच दिवशी कार्यकारी अभियंता यांच्या कार्यालयात उघडण्यांत आल्यात.

कार्यकारी अभियंता यांनी दोन्ही कामाच्या निविदेतील न्युनतम कंत्राटदार श्री जी.आर.घोडले यांच्या निविदाची छाननी करून पुढील अनुषंगिक कार्यवाहीसाठी व निविदा स्विकृतीच्या शिफारसी सह निविदा दिनांक २०.१.९७ रोजी सादर केल्यात याच काळात श्री जी.आर घोडले यांनी दिनांक २४.१.९७ रोजीच्या पत्रान्वये प्रकृती व्यवस्थीत

[ ......१०... ]

नसल्यामूळे ते परभणी येथील काम करु शकणार नाही असे कळविले. त्यामूळे त्यांच्या विरुध्द नियमानूसार कार्यवाही करण्यांत येत आहे.

परिणामी दुसरे निम्नतम कंत्राटदार श्री एम. डी. देशपांडे यांनी परभणी येथील २५ अल्प उत्पन्न गट व १५ मध्यम उत्पन्न गट [१] साठी दिलेल्या निविदा मंडळासमोर मंजूरीसाठी ठेवण्यांत आल्या आहेत. परभणी येथील २५ गाळे अल्प उत्पन्न गट व १५ गाळे मध्यम उत्पन्न गट [१] ही दोन्ही कामे विविध उत्पन्न गटासाठी असल्याने व दोन्ही योजनेचे नकाशे व बांधकामाच्या प्रकारात भिन्नता असल्याने दोन्ही कामासाठी निविदा कार्यकारी अभियंता यांनी वेगवेगळ्या मागविल्या आहेत. सदर कामाची निविदा वेगवेगळी मागविण्यांत आल्याच्या प्रक्रियेस मंजूरी मिळणेसाठी प्रस्ताव उप मुख्य अभियंता/पूणे मंडळ यांच्या कडे पाठविण्यांत आला असता त्यांनी या कामाची विभागणीच्या कार्यवाहीस मंडळाची कार्योत्तर मंजूर घ्यावी असे सुचविले आहे. त्यानूसार कामाची विभागणाच्या प्रस्ताव मंडळाच्या विचारार्थ सादर केला आहे असे कार्यकारी अभियंता यांनी प्रतिपादन केले.

या विषयावर चर्चा करतांना मंडळाच्या सदस्या श्रीमती उषा साने यांनी प्रतिपादन केले की २३.१२.९६ रोजी निविदा प्राप्त झाल्यानंतर ८.१.९७ च्या मंडळाच्या बैठकीत सदर निविदा मंजूरी साठी का ठेवण्यांत आल्या नाहीत ?

या वर खुलासा करण्यांत आला की, निविदा तपासणी, छाननी, करणेसाठी बराच कालावधी लागतो. त्यामूळे सदरच्या निविदा ८.१.९७ च्या बैठकीत ठेवता आल्या नाहीत.

दुसरे न्युन्तम ठेकेदार यांनी निविदेत दिलेल्या दर कमी करण्यासाठी मंडळासमोर श्री देशपांडे यांना बोलविण्यांत यावे असे मंडळाने ठरविले व त्यानुसार श्री देशपांडे यांना मंडळासमोर पाचारण करण्यांत आले व त्यांनी निविदेत दिलेला दर कमी करण्यांत मंडळाने त्यांना सुचविले.

यावर श्री देशपांडे यांनी निवेदन केले की, मी जो दर दिला आहे तो योग्य आहे या पेक्षा दर कमी करणे शक्य होणार नाही.

[... ११... ]

मंडळातर्फे श्री देशपांडे यांनी सांगितले की २५ अल्प उत्पन्न गट साठी जो दर दिला आहे त्याच दरात १५ मध्यम उत्पन्न गट गाळ्याचे बांधकाम करण्यांत यावे यावर श्री देशपांडे यांनी सांगितले की अल्प उत्पन्न गट व मध्यम उत्पन्न गट गाळ्यांच्या बांधकामाच्या प्रकरात भिन्नता आहे. मध्यम उत्पन्न गट साठी जे दरवाजे व खिडक्या अंदाज-पत्रका मध्ये नमूद केल्या आहेत त्या महाग आहेत.

या वर खुलासा करण्यांत आला की, खिडक्या व दरवाजे यांचे दर अंदाजपत्रकात ग्राहय धरलेले आहे तेंव्हा मध्यम उत्पन्न गट गाळ्यांच्या बांधकामासाठी जो निविदेत दर दिलेला आहे तो कमी करावा असे मंडळाने श्री देशपांडे यांना सांगितले.

श्री देशपांडे यांनी मंडळा समोरील वाटाघाटीनूसार मध्यम उत्पन्न गट गाळ्यांच्या बांधकामासाठी दिलेला दर ४८% जास्त हा एक टक्क्याने कमी करून ४७% जास्त या दराने काम करण्याची तयारी दर्शविली व तसे पत्र सादर केले व अल्प उत्पन्न गटातील बांधकामाच्या निविदेत दर आणखी कमी करण्यास असमर्थता व्यक्त केली.

यावर मंडळाने चर्चा करून एकमताने निर्णय घेतला की,

<u>ठराव क्र. ६२८</u>

१] परभणी येथील सर्वे क्र. ५२७[भाग] या जमीनीवरील बांधकामासाठी प्राप्त झालेल्या निविदा पैकी दुसरे न्युनतम ठेकेदार श्री देशपांडे यांची २५ अल्प उत्पन्न गट या गाळ्यांच्या बांधकामसाठी ४१%: [जास्त] या दराने व १५ मध्यम उत्पन्न गट गाळ्यांच्या बांधकामासाठी वाटाघाटीने ठेकेदाराने दिलेला दर ४७% जास्त या दराने मंडळ निविदा स्विकारण्यास ~~[illegible]~~ सर्वानुमते मंजूरी देत आहे.

२]अल्प उत्पन्न गट व मध्यम उत्पन्न गट [१] ही दोन्ही कामे विविध उत्पन्न गटासाठी असल्याने व दोन्ही योजनेची नकाशे व बांधकामाच्या प्रकारात भिन्नता असल्याने या कामासाठी कार्यकारी अभियंता औरंगाबाद मंडळ यांनी वेगवेगळया निविदा मागविल्या आहेत.

[....१२..]

या कामाच्या विभागणीच्या कार्यवाहीस मंडळ कार्योत्तर मंजूरी देत आहे. या ठरावाच्या स्थायी करणाची वाट न पाहता पूढील कार्यवाही करावी.

मा. सभापतीच्या परवानगीने आयत्या वेळेस येणारे विषय.

झोपडपट्टी सूधारणा कार्यक्रम १९९७-९८ अंतर्गत परभणी शहरातील परभणी नगर पालिकेच्या उर्वरित २० झोपडपट्टयातील सूधारणा कामाच्या प्रस्तावास प्रशासकिय मान्यता प्रदान करणे बाबत.

या विषयाची बाब टिप्पणी मंडळास वाचून दाखविण्यांत आली. त्यावर चर्चा करतांना मा. सभापती यांनी प्रतिपादन केले की, बाब टिप्पणी मध्ये "अ" अंतर्गत येणा-या आठ झोपडपट्टयांना प्रशासकिय मान्यता प्रदान करण्यांत यावी व "ब" मध्ये दर्शविलेल्या चार झोपडपट्टयांच्या सूधारणा कामासाठी नगर परिषदेने संबंधीत निमशासकिय/शासकिय जमीनीच्या बाबतीत संबंधीत कार्यालयाकडून ना हरकत प्रमाणपत्र घेऊन सदर "ना हरकत प्रमाणपत्र" औरंगाबाद मंडळास सादर केल्यानंतरच प्रशासकिय मान्यतेचे आदेश निर्गमीत करावेत. व बाब टिप्पणीणीतील "क" मध्ये दर्शविलेल्या आठ झोपडपट्टयाचे प्रशासकिय मान्यतेच्या प्रस्तावातील त्रुटीची पूर्तता केल्यावरच मान्यतेसाठी मंडळाच्या पूढील बैठकीत ठेवण्यांत यावे.

यावर सविस्तर चर्चा होऊन मंडळाने एकमताने निर्णय घेतला की

ठराव क्र. ६२९:

१] परभणी नगरपरिषदेच्या "अ" मधील दर्शविलेल्या आठ झोपडपट्टयातील रुपये ६५, १०, ५४७/- रकमेच्या प्रशासकिय मान्यतेच्या प्रस्तावास बाब टिप्पणीत निर्देशित केलेल्या अटींच्या आधीन राहून मंजूरी देण्यांत येत आहे.

२] परभणी नगरपरिषदेच्या "ब" मधील दर्शविलेल्या चार झोपडपट्टयांतील रुपये २१, ५२, २६५/ रकमेच्या प्रशासकिय मान्यतेच्या प्रस्तावास बाब टिप्पणीत निर्देशित केलेल्या अटींच्या अधिन राहून मंजूरी देण्यांत येते आहे. परंतू मंजूरीचे आदेश नगरपरिषदेने ना हरकतप्रमाणपत्र सादर केल्यावरच मा. सभापती यांच्या सहमतीने निर्गमीत करण्यांत यावेत.

३] परभणी नगर परिषदेच्या "क" मधील दर्शविलेल्या आठ झोपडपट्टयातील सुधारणा कामाचे प्रस्ताव प्रशासकिय मान्यतेसाठी सर्व अटीची पूर्तता केल्यानंतरच पुढील बैठकीत ठेवण्यांत यावे.

[२] मा. सभापती, किशनचंदजी तनवाणी यांनी मंडळास माहिती दिली की, औरंगाबाद येथील पोलिस कर्मचा-यांसाठी असलेले विश्रामगृह हे पाडल्याने पोलिसांना विश्रामगृहाची व्यवस्था करण्यांत यावी म्हणून मा. गृहनिर्माण मंडळ मंत्री महोदयांनी सूचना दिल्या होत्या. म्हणून आपल्या कार्यालयाचे इमारत क्र. २ मधील म्हाडाचे विश्राम गृह पोलिसांना देण्यांत आले होते. परंतू लेखा परिक्षणात विश्रामगृहाच्या नोंद पुस्तकेची तपासणी होऊन प्रत्येकी रूपये १००/- प्रतिदिनी असा दर लावण्यांत येवून त्याप्रमाणे ५४,०००/- रूपये वसूल करावे असे नमूद करण्यांत आले आहे.

मा. सभापतीनी सांगितले की मा. मंत्री महोदयांनी पोलिसासाठी विश्रामगृह उपलब्ध करून देण्यांच्या सुचना दिल्या होत्या त्यानुसार ~~म्हणून~~ त्यांना विश्राम गृह दिले होते ~~तेव्हा रूपये~~ त्या अनुषंगाने १००/- प्रति व्यक्ती प्रतिदिनी न आकारता म्हाडा कर्मचा-यांना ज्या प्रमाणे दर आकारण्यांत येतो तो दर आकारण्यांत यावा अशी शिफारस मंडळाच्या वतीने प्राधिकरणाकडे करण्यांत यावी व त्याप्रमाणे पोलिस कर्मचा-यांकडून पैसे वसूल करून घेण्यांत यावेत.

यावर सविस्तर चर्चा होऊन मंडळाने असा सर्व निर्णय घेतला की,

"म्हाडाच्या कर्म चा-यांना म्हाडाचे विश्रामगृह वापरण्यासाठी जो दर आकारला जातो तोच दर विशेष बाब म्हणून पोलिस कर्मचा-यांना आकारण्यात यावा म्हणून प्रस्ताव प्राधिकरणाकडे मंजूरीस्तव पाठवावा."

[signature]

..... [१४..]

तसेच हे पोलिस अधिकारी शासकीय गृहासाठी येथे औरंगाबाद वास्तव्यास होते त्या अधिकाऱ्यांना रु. ४५०/- प्रतिमाह घरभाडे भत्ता मिळत असल्याने त्यांच्याकडून रु. ७०/- प्रतिदिन घेणे संयुक्तिक नाही व असा वसूल करणे अपेक्षितही नाही. ठेवा.

[signature]

३] मा. सभापती औरंगाबाद मंडळ यांनी सुचविले की, गृहनिर्माण भवनाजवळ असलेल्या उच्च उत्पन्न गटातील गाळयांना ब-याच वेळा जाहिरात देऊन ही मागणी येत नाही व बन्सीलाल नगर येथील ८४ गाळे उच्च उत्पन्न गट या गाळयांना मागणी आहे. तेंव्हा बन्सीलाल नगर येथील सेवानिवासस्थानात राहत असलेल्या कर्मचा-यांना गृहनिर्माण भवनाजवळील रिक्त असलेल्या उच्च उत्पन्न गट गाळयातील सेवानिवासस्थान यावे व बन्सीलालनगर येथील गाळयांना मागणी असल्याने ते गाळे विक्री करावे.

यावर खुलासा करण्यांत आला की, सेवानिवासस्थान जाहिर करण्याचे अधिकार हे प्राधिकरणास आहे तेंव्हा तसे करता येणार नाही.

या वर मा. सभापती महोदयांनी प्रतिपादन केले की, बन्सीलाल नगर पेक्षा गृहनिर्माण भवनाजवळील सेवानिवासस्थाने कर्मचा-यांना जवळ पडतील व कार्यालयाच्या दृष्टीने सोयीस्कर होईल.

चर्चेच्या ओघात असे ठरले की, या बाबत प्राधिकरणाकडे प्रस्ताव पाठवावा.

मंडळाचे सदस्य श्री प्रा. नंदु कुलकर्णी यांनी प्रतिपादन केले की, कौठा नांदेड येथील उर्वरित २०२ गाळयांची योजना त्वरीत राबवावी.

यावर मा. सभापती महोदयांनी प्रतिपादन केले की, जाहिरात देऊन रुपये २५,०००/- अर्जा सोबत घ्यावे तसेच कार्यकारी अभियंता यांनी या योजनेचे अंदाजपत्रक तयार करावे व त्या प्रमाणे जाहिरात देऊन मागणी नोंदवून योजना प्राधिकरणाकडे पाठवावी.

परभणी येथील योजना कार्यान्वीत झाल्यानंतर तेथील उर्वरित गाळयांसाठी जाहिरात द्यावी या अनुषंगाने श्रीमती उषा साने सदस्या औरंगाबाद मंडळ यांनी सुचविले की जाहिरातीची मुदत एकमहिन्या ऐवजी दोन महिने ठेवण्यांत यावी.

बैठकीच्या शेवटी शहर अभियंता महानगरपालिका औरंगाबाद यांनी झोपडपट्टी सुधारणा योजनेच्या प्रस्तावाना प्रशासकिय मान्यता द्यावी अशी मंडळास विनंती केली यावर मंडळाने असे सुचविले की औरंगाबाद महानगरपालिकेकडून अंदाज पत्रके प्राप्त झाल्यावरच त्यांना मंडळाच्या पुढील बैठकीत झोपडपट्टी सुधारणा योजनेच्या त्यांच्या प्रस्तावाना प्रशासकिय मान्यता प्रदान करण्यांत यावी.

शेवटी मुख्य अधिकारी यांनी सर्व उपस्थितीचे आभार मानले व राष्ट्रगीता नंतर मा. सभापतीच्या परवानगीने सभा संपल्याचे जाहिर केले.

[ किशनचंद तनवाणी ]
सभापती
औरंगाबाद मंडळ.